## आजचे पंचांग

सोमवार दि. १८ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, द्वितीया संध्याकाळी ५-५४ पर्यंत नंतर तृतीया तिथी, दिवस नक्षत्र– रोहिणी सकाळी ११-३२ पर्यंत नंतर मृगशीर्ष, चंद्र रास- वृषभ रात्री १०-०५ पर्यंत नंतर मिथुन, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## सीएनजी दरात पुन्हा वाढ

**नवी दिल्ली**: दिल्ली-एनसीआरमध्ये सीएनजीच्या दरात सलग दुसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे. आजपासून सीएनजीचा दर १ रुपया प्रति किलो महाग होणार आहे. या निर्णयानंतर, दिल्लीत सीएनजी आता ८०.०९ आणि नोएडा-गाझियाबादमध्ये ८८.७० प्रति किलो दराने उपलब्ध होईल. दोन दिवसांतील ही दुसरी दरवाढ असून, यापूर्वी १५ मे रोजी २ रुपयांची दरवाढ झाली होती. काँग्रेस पक्षाने केंद्र सरकारवर टीका केली असून, दिल्ली काँग्रेसने शनिवारी जोरदार आंदोलन केले.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. १८ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २३२ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### वीज कोसळून एकाचा मृत्यू, पाच जखमी

**कोझिकोड** : कोझिकोड (केरळ) जिल्ह्यात रविवारी वीज कोसळण्याच्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये एकाचा मृत्यू झाला आणि पाच जण जखमी झाले. कुडारणजीमधील कूंबरा येथे वीज कोसळून एकाचा मृत्यू झाला तर एक जण जखमी झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जैसन असे मृताचे नाव असून तो कुंभाराच्या मुंडुमाला येथील पोल्ट्री फार्ममध्ये होता, जेव्हा त्याच्यावर वीज कोसळली.

### जरातमध्ये २.५६ कोटींची रोकड जप्त

**दाहोद** : गुजरातमधील दाहोद येथे एका कारमधून २.५६ कोटी रुपयांची बेहिशेबी रोकड जप्त करण्यात आली आहे. शनिवारी धानपूर चौकीजवळ कार अडवण्यात आली, अशी माहिती पोलिस उपअधीक्षक ए. के. कलस्वा यांनी दिली. "कारमध्ये एक पार्सल सापडले आहे. त्यात २.५६ कोटी रुपयांची रोकड होती. दाहोदच्या अंगडिया (पारंपरिक कुरिअर) कंपनीतून हे पैसे वडोदराला पाठवले जात होते. वाहनचालक राजू निनामा याला रोख रकमेचा स्रोत आणि वाहतुकीबाबत कोणतीही कागदपत्रे किंवा पुरावे सादर करता आले नाहीत.

### ओडिशामध्ये पुन्हा उष्णतेची लाट

**भुवनेश्वर** : ओडिशामध्ये ११ ठिकाणी कमाल तापमान ४० अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त नोंदले गेले आहे. पुढील तीन ते चार दिवस दिवसाच्या तापमानात दोन ते तीन अंशांनी वाढ होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, पश्चिम ओडिशातील बौध शहरात दिवसाचे तापमान ४२.९ अंश सेल्सिअस नोंदले गेले आणि ते राज्यातील सर्वात उष्ण ठिकाण होते.

### २० हजार टन एलपीजी घेऊन 'सिमी' जहाज कांडला बंदरात दाखल

# भारतीयांना दिलासा; ऊर्जा सुरक्षा कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील तणाव आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील विस्कळीत वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर भारताच्या ऊर्जा सुरक्षेला दिलासा देणारी महत्त्वाची घडामोड घडली आहे. तब्बल २० हजार टन लिक्विड प्रोपेन आणि ब्युटेन घेऊन निघालेले 'सिमी' हे मालवाहू जहाज गुजरातमधील कांडला येथील दीनदयाळ बंदरात सुरक्षितपणे दाखल झाले आहे.

मार्शल आयलंडचा ध्वज असलेल्या या जहाजाने १३ मे रोजी अत्यंत संवेदनशील मानली जाणारी होर्मुझ सामुद्रधुनी यशस्वीपणे पार केली. आंतरराष्ट्रीय पातळीवर ऊर्जा पुरवठा साखळीवर ताण निर्माण झालेला असताना हे जहाज भारतात सुरक्षित पोहोचल्याने ऊर्जा क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला आहे.

'सिमी' जहाजावर २१ कर्मचाऱ्यांचा ताफा आहे. त्यात ८ युक्रेनियन आणि १३ फिलिपिनो नागरिकांचा समावेश आहे. सध्याच्या आव्हानात्मक परिस्थितीत होर्मुझ सामुद्रधुनी पार करून भारतात पोहोचणारे हे ११ वे एलपीजी जहाज ठरले आहे. या जहाजाचा प्रवास सुरक्षित करण्यासाठी भारताच्या नौवहन महासंचालनालयाने महत्त्वाची भूमिका बजावली. परराष्ट्र मंत्रालय, संरक्षण मंत्रालय आणि पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय यांच्यातील समन्वयामुळे हे जहाज सुरक्षितपणे भारतात आणणे शक्य झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. गेल्या ७५ दिवसांपेक्षा अधिक काळ होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक विस्कळीत झाल्याने जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर मोठा ताण निर्माण झाला आहे. या परिस्थितीचा परिणाम भारतावरही झाला असून, गेल्या काही महिन्यांत देशातील कच्च्या तेलाच्या साठ्यात सुमारे १५ टक्क्यांची घट झाली आहे.

कमोडिटी ॲनालिटिक्स फर्म 'केपलर'च्या आकडेवारीनुसार, मध्य पूर्वेतील संघर्ष सुरू होण्यापूर्वी, म्हणजे फेब्रुवारीच्या अखेरीस भारताचा एकूण कच्च्या तेलाचा साठा १० कोटी ७० लाख बॅरल्स होता. आता हा साठा घटून ९ कोटी १० लाख बॅरल्सवर आला आहे. या साठ्यात धोरणात्मक राखीव साठा, रिफायनरी साठा आणि व्यावसायिक साठ्याचा समावेश आहे. कच्च्या तेलाच्या आयातीत घट झाली असली, तरी भारतीय तेल कंपन्यांनी सध्या प्रक्रिया आणि उत्पादन पातळी स्थिर ठेवली आहे. अद्याप उत्पादनात मोठी कपात करण्यात आलेली नाही. भारताचा सध्याचा कच्च्या तेलाचा वापर प्रतिदिन सुमारे ५० लाख बॅरल्स इतका आहे. 'केपलर'च्या आकडेवारीनुसार, देशाकडे उपलब्ध असलेला कच्च्या तेलाचा साठा पुढील १८ दिवसांची गरज भागवू शकतो.

होर्मुझ सामुद्रधुनीतील तणाव कायम असताना एलपीजी वाहतूक सुरू ठेवणे भारताच्या ऊर्जा पुरवठ्यासाठी अत्यावश्यक ठरत आहे. त्यामुळे कांडला बंदरात दाखल झालेले हे जहाज केवळ मालवाहतुकीची घटना नसून, संकटकाळातील ऊर्जा व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्त्वाची घडामोड ठरली आहे.

## श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिराला 'अ' वर्ग दर्जा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराला राज्य सरकारने 'अ' वर्ग पर्यटन क्षेत्राचा दर्जा दिला आहे. या निर्णयामुळे मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार असून पुण्याचे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक पर्यटन स्थळ म्हणून महत्त्व आणखी वाढणार आहे. यापूर्वी दगडूशेठ गणपती मंदिराचा समावेश 'क' वर्ग पर्यटन क्षेत्रात होता. मंदिरात येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या आणि मंदिराचे धार्मिक-सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन राज्य सरकारने मंदिराचा दर्जा 'अ' वर्गात वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

नव्या दर्जामुळे मंदिर आणि परिसराच्या विकासासाठी विशेष सरकारी निधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. या निधीतून मंदिर परिसराचे सुशोभीकरण, भाविकांसाठी आधुनिक सुविधा, रस्ते संपर्क सुधारणा आणि पर्यटन सुविधांचा विकास करण्यात येणार आहे. यामुळे भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सोनेसांगवीत पोलिसांवर गोळीबार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांजणगाव गणपती** : दिघी येथे गोळीबार करून पसार झालेल्या दोन आरोपींनी पाठलाग करणाऱ्या पोलिसांवर गोळीबार केल्याची धक्कादायक घटना सोनेसांगवी, ता. शिरूर गावाजवळ घडली. शनिवारी, १६ मे रोजी रात्री घडलेल्या या घटनेनंतर दोन्ही आरोपी उसाच्या शेतात पळून गेले.

दोन दिवसांपूर्वी दिघी येथे गोळीबार करून पळालेले दोन आरोपी रांजणगाव गणपतीजवळील शेळके वस्तीवर असल्याची माहिती पिंपरी-चिंचवड पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांचे पथक शनिवारी या भागात दाखल झाले. पोलिसांची चाहूल लागताच आरोपींनी दुचाकीवरून सोनेसांगवी गावाच्या दिशेने पळ काढला. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. मात्र, काही अंतरावर दुचाकी बंद पडल्याने आरोपींनी ती रस्त्यातच सोडली आणि पोलिसांच्या दिशेने गोळीबार केला. या वेळी पोलिसांनीही प्रत्युत्तरादाखल गोळीबार केला. त्यानंतर दोन्ही आरोपी जवळच्या उसाच्या शेतात पळून गेले.

गोळीबार करणाऱ्या आरोपींपैकी एकाचे नाव शेखर संभाजी जाधव, रा. शिक्रापूर, ता. शिरूर असे असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. त्याने दोन दिवसांपूर्वी करण राठोड, रा. चऱ्होली फाटा, ता. हवेली यांच्यावर गोळीबार केल्याचा आरोप आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले आणि शिरूरचे पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

### उदयनिधी स्टॅलिन यांच्या अडचणींत वाढ

# सनातन संपविण्याची भाषा पडणार महागात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चेन्नई** : "सनातन धर्म संपवावाच लागेल," या विधानामुळे द्रमुक आमदार आणि तामिळनाडूचे विरोधी पक्षनेते उदयनिधी स्टॅलिन यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी तामिळनाडू विधानसभेत त्यांनी केलेल्या या विधानावरून वाद निर्माण झाला असून हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे.

यापूर्वीही उदयनिधी स्टॅलिन यांनी सनातन धर्माबाबत वादग्रस्त विधान केले होते. त्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने त्यांना कडक शब्दांत फटकारले होते. मात्र, यंदा त्यांनी विधानसभेच्या कामकाजादरम्यान हे वक्तव्य केल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, सर्वोच्च न्यायालयात एका वकिलाने याचिका दाखल केली आहे. या याचिकेत उदयनिधी स्टॅलिन यांच्या सनातन धर्मावरील विधानाचा उल्लेख करण्यात आला आहे. ही याचिका अवमानना याचिकेच्या स्वरूपात दाखल करण्यात आली असून ती 'शाहीन अब्दुल्ला विरुद्ध भारतीय संघराज्य' या प्रकरणाशी संबंधित असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने द्वेषयुक्त भाषणांच्या प्रकरणांमध्ये एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिले होते. महिला वकील अमिता सचदेवा यांनी ही अवमानना याचिका दाखल केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही उदयनिधी स्टॅलिन यांच्यावर पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही, असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. ही याचिका उदयनिधी यांच्या जुन्या विधानाच्या पार्श्वभूमीवर २९ एप्रिल रोजी दाखल करण्यात आली होती. न्यायमूर्ती विक्रम नाथ यांच्या खंडपीठाने ती सुनावणीसाठी स्वीकारली होती. आता या याचिकेत नवीन मुद्दा जोडण्यात आला असून तामिळनाडू विधानसभेतील उदयनिधी यांच्या अलीकडील विधानाचाही उल्लेख करण्यात आला आहे.

सप्टेंबर २०२३ मध्ये एका कार्यक्रमात उदयनिधी स्टॅलिन यांनी सनातन धर्माची तुलना डेंग्यू आणि मलेरियाशी केली होती. तसेच तो नष्ट केला पाहिजे, असे विधान त्यांनी केले होते. त्या वक्तव्यावरून देशभरात मोठा वाद निर्माण झाला होता. भाजपसह अनेक पक्षांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली होती.

दरम्यान, उदयनिधी स्टॅलिन यांनी स्पष्टीकरण दिले आहे. "आम्ही कोणत्याही देवाच्या किंवा श्रद्धेच्या विरोधात नाही. जातीच्या आधारावर होणाऱ्या भेदभावाचा आम्ही विरोध करतो," असे त्यांनी म्हटले आहे. मी तामिळनाडू विधानसभेत बोलताना लोकांना विभागणारी जातीव्यवस्था नष्ट झाली पाहिजे, असे म्हटले होते. द्रविडी चळवळ ही संघर्षातून उभी राहिल्याचे सांगत उदयनिधी यांनी म्हटले की, जातीव्यवस्था संपवणे म्हणजे धर्म किंवा पूजेला विरोध करणे नव्हे, असेही म्हटले आहे.

### संभाजीनगर येथील समाज मंदिराचा विषय ऐरणीवर

## महेश लांडगे आणि मंगला कदम आमनेसामने

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**पिंपरी** : संभाजीनगर येथील समाज मंदिराच्या विषयावरून माजी महापौर मंगला कदम आणि आमदार महेश लांडगे यांच्यात भररस्त्यात शाब्दिक चकमक झाली. काशिनाथ नखाते यांनी आयोजित केलेल्या कामगार मेळाव्यानंतर साई गार्डनबाहेर हा प्रकार घडला.

रविवार, १७ मे रोजी काशिनाथ नखाते यांच्या वतीने कामगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात कामगारांना श्रम प्रतिष्ठा पुरस्कार, विविध सन्मान आणि विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यात आले. आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले. कार्यक्रम संपल्यानंतर आमदार लांडगे साई गार्डनबाहेर पडत असताना माजी महापौर मंगला कदम कार्यकर्त्यांसह तेथे आल्या आणि त्यांनी लांडगे यांना थांबवून तीव्र नाराजी व्यक्त केली.

संभाजीनगर येथील समाज मंदिराच्या कामात अडथळे आणले जात असल्याचा आरोप कदम यांनी केला. "दादा, तुमच्यामुळे आम्ही विलास लांडे यांना पाडले आणि तुम्हाला निवडून दिले," अशा शब्दांत त्यांनी लांडगे यांच्याशी खडा संवाद साधला. आमदारांचे पत्र असतानाही प्रभाग क्रमांक ११ मधील नगरसेवक संबंधित कामात हस्तक्षेप करत असून त्रास देत असल्याची तक्रारही त्यांनी यावेळी मांडली. घटनास्थळी उपस्थित नागरिक आणि माध्यम प्रतिनिधींनी दिलेल्या माहितीनुसार, प्रभाग क्रमांक ११ मधील चारही नगरसेवकांविरोधात आणि भाजपाविरोधात काही कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. त्यामुळे परिसरात काही काळ तणावपूर्ण झाला होता.या घटनेचे चित्रीकरण करण्याचा प्रयत्न काही माध्यम प्रतिनिधींनी केला. मात्र, चित्रीकरणास मज्जाव करण्यात आल्याचा आरोप उपस्थित माध्यम प्रतिनिधींनी केला.

### नीट पेपरफुटीप्रकरणी लातूर कनेक्शन स्पष्ट

**लातूर** : देशभरात गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासात लातूर कनेक्शन अधिक गडद होत चालले आहे. सीबीआयने लातूरमध्ये पुन्हा तपासाची हालचाल वाढवली असून, सुतमील परिसरातील एका खासगी ट्युशन संचालकाच्या कार्यालयात तपास सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. दोन दिवसांपूर्वी सीबीआयने लातूरमध्ये कारवाईला सुरुवात केली होती. त्यावेळी संबंधित खासगी ट्युशन चालकाच्या घरी तब्बल ११ तास तपासणी करण्यात आली. घरातील कागदपत्रे, मोबाईल, संगणक तसेच विद्यार्थ्यांशी संबंधित नोंदींची तपासणी करण्यात आल्याची माहिती आहे.

## मराठा समाजासाठी योजना सुरूच

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : मराठा समाजासाठी राज्य सरकारने सातत्याने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून कोणतीही योजना बंद करण्यात आलेली नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

सारथी संस्था, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, शिष्यवृत्ती योजना आणि विद्यार्थ्यांसाठीचा निर्वाह भत्ता यांसारख्या योजनांद्वारे मराठा समाजातील तरुणांना मोठा आधार मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

फडणवीस म्हणाले की, सारथीसारखी संस्था उभारल्यामुळे मराठा समाजातील अनेक तरुण आयएएस, आयपीएस, एमपीएससी आणि इतर स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवत आहेत. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून विक्रमी संख्येने उद्योजक तयार झाले आहेत. शिक्षण क्षेत्रातही शिष्यवृत्ती योजना सुरू असून, ज्यांना वसतिगृहात जागा मिळत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता दिला जात आहे. जे अर्ज नियमात बसतात, त्यांना प्रमाणपत्रे दिली जात आहेत," असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

जात वैधता प्रक्रियेबाबत बोलताना फडणवीस म्हणाले की, ही प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार केली जाते. त्यासाठी समिती सर्वोच्च न्यायालयानेच तयार केली आहे. निकषही सर्वोच्च न्यायालयाने ठरवले असून त्या समितीला सर्व अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे राज्य सरकार त्यात हस्तक्षेप करू शकत नाही, असे त्यांनी सांगितले. हैदराबाद गॅझेट दिल्यानंतर त्यासंदर्भातील प्रकरण उच्च न्यायालयात सुरू आहे. त्या प्रकरणाचा निकाल अद्याप लागलेला नाही. न्यायालयाचा अवमान होऊ नये, यासाठी विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

### होर्मुज संकटाच्या पार्श्वभूमीवर भारताची ऊर्जा सुरक्षा मजबूत

# युएई भारतासाठी ३ कोटी बॅरल तेलसाठा वाढवणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर पश्चिम आशियात निर्माण झालेल्या तणावामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळीवर गंभीर परिणाम होत आहे. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर जगातील महत्त्वाच्या ऊर्जा मार्गांपैकी एक असलेल्या होर्मुज सामुद्रधुनीतून तेल आणि वायू वाहतूक करणाऱ्या जहाजांची हालचाल विस्कळीत झाली आहे. या परिस्थितीत भारतासारख्या मोठ्या ऊर्जा आयातदार देशांसमोर इंधनपुरवठ्याचे आव्हान निर्माण झाले असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युएई दौऱ्यात भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण करारांना गती मिळाली आहे. संयुक्त अरब अमिरातीची सरकारी तेल कंपनी एडीएनओसी भारतातील कच्च्या तेलाचा साठा वाढवून तो ३० दशलक्ष म्हणजेच ३ कोटी बॅरलपर्यंत नेण्यास सहमत झाली आहे. एडीएनओसी सध्या मंगळुरू येथील केंद्रात ६० लाख बॅरल कच्चे तेल साठवते. नव्या करारामुळे भारताच्या सामरिक पेट्रोलियम साठ्यात ४ दशलक्ष टनांहून अधिक अतिरिक्त कच्च्या तेलाची भर पडणार आहे. भारताकडे सध्या विशाखापट्टणम, मंगळुरू आणि पादूर येथे मिळून ५.३ दशलक्ष टन म्हणजेच



सुमारे ३८ दशलक्ष बॅरल इतका आपत्कालीन तेलसाठा आहे. २०२१ मध्ये मंजूर झालेल्या दुसऱ्या टप्प्यात ओडिशातील चांदीखोल आणि पादूर येथे ६.५ दशलक्ष टन क्षमतेचे नवे साठे उभारले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर युएईसोबतचा वाढीव तेलसाठा करार भारतासाठी धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. होर्मुज सामुद्रधुनीतून होणाऱ्या इंधनपुरवठ्यावर भारताचे अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकार अनेक पातळ्यांवर काम करत आहे. भारत आणि युएईदरम्यान एलएनजी आणि एलपीजी साठवणुकीसंदर्भातही महत्त्वपूर्ण करार झाले आहेत. याशिवाय युएईतील फुजैरा येथे कच्च्या तेलाचा साठा करण्याबाबतही दोन्ही देशांमध्ये सहमती झाल्याची माहिती आहे. फुजैरा हे होर्मुज सामुद्रधुनीच्या बाहेरील महत्त्वाचे ऊर्जा केंद्र मानले जाते. त्यामुळे भविष्यात होर्मुज मार्गात अडथळे निर्माण झाले, तरी भारताला पर्यायी पुरवठा साखळी उपलब्ध राहू शकते. युएई हा भारताला कच्चे तेल पुरवणाऱ्या आघाडीच्या ५ देशांपैकी एक आहे. सध्या युएई दररोज ३ ते ३.२ दशलक्ष बॅरल तेल उत्पादन करतो. २०२७ पर्यंत हे उत्पादन ५ दशलक्ष बॅरल प्रतिदिन करण्याचे युएईचे उद्दिष्ट आहे. उत्पादनवाढीच्या या धोरणाचा भारताला दीर्घकालीन फायदा होऊ शकतो. कारण भारताच्या वाढत्या ऊर्जा गरजा लक्षात घेता स्थिर, विश्वासार्ह आणि दीर्घकालीन पुरवठादार देशांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरत आहे. स्वयंपाकाच्या गॅसपुरवठ्याच्या दृष्टीनेही भारतासाठी महत्त्वाची घडामोड झाली आहे. एडीएनओसी आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन यांच्यात एलपीजी पुरवठा विस्ताराचा करार झाला आहे. भारतातील घरगुती गॅसपुरवठा अधिक स्थिर राहण्यास मदत होणार आहे. भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने हे सर्व करार आणि योजना एकाच व्यापक धोरणाचा भाग मानल्या जात आहेत.

## ३० मेपासून मनोज जरांगे यांचे बेमुदत उपोषण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जालना** : मराठा आरक्षण कार्यकर्ते मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाची घोषणा केली आहे. मराठवाड्यात कुणबी जातीचे प्रमाणपत्र वाटप सुरू करण्यासाठी त्यांनी राज्य सरकारला २९ मेपर्यंतची मुदत दिली असून, मागण्या मान्य न झाल्यास ३० मेपासून बेमुदत उपोषण सुरू करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी येथे शनिवारी पत्रकारांशी बोलताना जरांगे यांनी राज्य सरकारवर तीव्र टीका केली. मराठा आरक्षण उपसमिती बरखास्त करण्याची मागणी करत त्यांनी या समितीने मराठा समाजासाठी काहीही केले नसल्याचा आरोप केला.

जरांगे म्हणाले की, मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया राज्य सरकारने पूर्णपणे थांबवली आहे. "पूर्वी आम्हाला जातीचे दाखले मिळत होते. मात्र, आता हे वितरण बंद करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही प्रक्रिया थांबवली आहे," असा आरोप त्यांनी केला. हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्रांची मागणी केल्यानंतर काही प्रमाणपत्रे मिळाली होती. मात्र, आता अधिकारी सरकारकडून प्रमाणपत्रे न देण्याच्या सूचना आल्याचे सांगत असल्याचा दावा जरांगे यांनी केला.

राज्य सरकारने सातारा, औंध आणि इतर गॅझेटची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

## संपादकीय

# घसरत्या रुपयाची घरघर आणि धोरणात्मक सुस्ती!




**जागतिक बाजारातील उलथापालथींमुळे डॉलरच्या तुलनेत रुपयाने आजवरची नीचांकी पातळी गाठली असताना, मिंट रोड आणि नॉर्थ ब्लॉकने केवळ तांत्रिक मलमपट्टी न करता, या घसरणीमागील संरचनात्मक आजारांवर वेळीच आणि धाडसी उपाययोजना करण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे.**

चलन बाजाराच्या पटावर जेव्हा एखादा देश आपल्या नाण्याची सातत्यपूर्ण घसरण पाहतो, तेव्हा तो केवळ एका तांत्रिक आकड्यांचा खेळ नसतो. डॉलरच्या दराची प्रत्येक वाढ ही देशांतर्गत अर्थव्यवस्थेच्या कमकुवत पायावर पडलेला हातोडा असते. सध्या रुपया ज्या पद्धतीने ऐतिहासिक नीचांकी पातळीकडे घसरत चालला आहे, ती देशाच्या आर्थिक स्वास्थ्याला लागलेल्या गंभीर आजाराचा ताळेबंद आहे. जागतिक बाजारातील महाकाय चढ-उतार, अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हची व्याजदरविषयक आक्रमकता आणि मध्यपूर्वेतील भूराजकीय धुमसती शेकोटी ही कारणे नेहमीच बचावासाठी 'ढाल' म्हणून पुढे केली जातात. परंतु, या बाह्य कारणांच्या आडून आपण आपल्या देशांतर्गत अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक दोषांकडे किती काळ डोळेझाक करणार, हा खरा प्रश्न आहे. घसरणारा रुपया हा आपल्या धोरणकर्त्यांच्या सुस्तीवर ओढलेला थेट चाबूक आहे. या घसरणीमागील सर्वात मोठे आणि उघड कारण म्हणजे भारताचे फुगलेले आयात बिल आणि सतत धगधगती राहणारी चालू खात्यावरील तूट हे आहे. आपण आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी तब्बल ८५ टक्क्यांहून अधिक भाग आयात करतो, हे वास्तव आपण बदलू शकलेलो नाही. जेव्हा जेव्हा जागतिक बाजारात डॉलर वधारतो आणि रुपयाची घसरगुंडी सुरू होते, तेव्हा केवळ तेलच महाग होत नाही, तर त्यासोबत येणारी आयातित महागाई संपूर्ण अर्थव्यवस्थेला आपल्या विळख्यात घेते. रिझर्व्ह बँकेकडून परकीय चलन साठ्यातून डॉलर बाजारात सोडून रुपया सावरण्याचा जो काही 'प्रुडंट' म्हणजेच विवेकी पवित्रा घेतला जातो, ती केवळ मलमपट्टी आहे. भांडवली बाजारातून परकीय पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांची होणारी सातत्यपूर्ण माघार आणि देशांतर्गत उत्पादकतेतील संथपणा यामुळे रुपयावरचा ताण दिवसागणिक वाढत आहे. रुपया तेव्हाच मजबूत होऊ शकतो, जेव्हा देशाची निर्यात क्षमता जागतिक दर्जाची बनते. दुर्दैवाने, गेल्या काही वर्षांत आपल्या निर्यातीची वाढ ही संथ राहिली आहे, तर आयातीचा आलेख मात्र उंचावत चालला आहे. त्यातच, जागतिक गुंतवणूकदार जेव्हा सुरक्षित गुंतवणूक म्हणून डॉलरकडे धाव घेतात, तेव्हा रुपयासारख्या विकसनशील देशांच्या चलनाची अवस्था अधिकच बिकट होते. या परिस्थितीत, रिझर्व्ह बँकेवर सर्व भार सोपवून सरकारने राजकोषीय आघाडीवर हात झटकणे चुकीचे ठरेल. प्रशासकीय आणि धोरणात्मक अंगाने विचार केला तर, रुपयाच्या या घसरणीमुळे देशांतर्गत महागाईचा भडका उडण्याची दाट शक्यता असते. महागाई वाढली की रिझर्व्ह बँकेला व्याजदर चढे ठेवावे लागतात, ज्यामुळे सर्वसामान्यांच्या कर्जाचे हप्ते महागतात आणि बाजारातील भांडवलाची तरलता कमी होते. हा एक असा चक्रव्यूह आहे, ज्यात अखेर सामान्य नागरिक आणि मध्यमवर्गीय उद्योजक भरडला जातो. आज आपण जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या घोषणा करत असताना, आपल्या चलनाची ही अवस्था आपल्या दाव्यांमधील फोलपणा उघड करणारी ठरते. थॉमस एडिसन यांनी म्हटले होते की, मालमत्तेचे मूल्य तिच्या उपयुक्ततेमध्ये असते; हेच तत्त्व राष्ट्राच्या चलनाबाबतही लागू होते. रुपयाची ताकद ही देशाच्या आर्थिक स्वावलंबनावर आणि उत्पादकतेवर अवलंबून असायला हवी. जोपर्यंत आपण आयातीवरील, विशेषतः इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अपारंपरिक ऊर्जेकडे आणि देशांतर्गत उत्पादनाकडे युद्धपातळीवर वळत नाही, तोपर्यंत आंतरराष्ट्रीय बाजारातील प्रत्येक लहान ठिणगी रुपयाला चटके देत राहील. घसरत्या रुपयाने वाजवलेली ही धोक्याची घंटा म्हणजे धोरणकर्त्यांसाठी खडबडून जागे होण्याची अंतिम संधी आहे. तात्पुरते डॉलर्स बाजारात ओतून रुपया सावरण्याचा खेळ आता थांबवला पाहिजे. आंतरराष्ट्रीय वित्तीय बाजारातील लहरींवर विसंबून न राहता, देशांतर्गत संरचनात्मक सुधारणा, कररचनेतील सुटसुटीतपणा आणि निर्यातीला थेट प्रोत्साहन देणे हेच काय ते शाश्वत उपाय आहेत. केवळ आकड्यांची आकडेमोड करून किंवा जागतिक संकटांचा बागुलबुवा उभा करून रुपयाची पत राखता येणार नाही. या आर्थिक वास्तवाचा स्वीकार करून वेळीच कठोर निर्णय घेण्याची सुबुद्धी सत्तेच्या उबदार खुर्चीवर बसलेल्यांना लाभो, हीच माफक अपेक्षा.

# गुंतवणुकीचा डॉलर-मोह आणि सार्वभौमत्वाचा पाया!



मुंबईतील मिंट रोडवर असलेल्या रिझर्व्ह बँकेच्या इमारतीतून जेव्हा परकीय चलन साठ्याचे आकडे जाहीर होतात, तेव्हा त्याकडे केवळ एक आर्थिक निर्देशांक म्हणून पाहून चालत नाही. तो देशाच्या आर्थिक सार्वभौमत्वाचा ताळेबंद असतो. थॉमस एडिसन यांनी म्हटले होते की, मालमत्तेचे मूल्य तिच्या उपयुक्ततेमध्ये असते; परंतु भारताने आपल्या विस्तृत रेल्वे जाळे, भूखंड आणि महामार्ग यांसारख्या देशांतर्गत मालमत्तांना आजवर केवळ वित्तीय खात्यातील कोरड्या नोंदी म्हणून हाताळले आहे, डॉलरमध्ये त्यांचे मूल्य मिळवण्याचा विचार कधी केलाच नाही. या पार्श्वभूमीवर, १६.७२ लाख कोटी रुपयांच्या मालमत्तांच्या मुद्रीकरणासाठी त्यांचे डॉलर-मूल्यांकित एक्सचेंज-ट्रेडेड फंडांमध्ये बंडलिंग करण्याचा आणि 'फोरेक्स फोर्ट्रेस' म्हणजेच परकीय चलनाची अभेद्य तटबंदी उभारण्याचा सल्ला वरवर पाहता अत्यंत सुबक वाटत असला, तरी त्यातील मूळ मेख समजून घेतली पाहिजे.

रॉबर्ट सोलोपासून ते बेला बालासा आणि पॉल सॅम्युएलसन यांच्यापर्यंतच्या जागतिक कीर्तीच्या अर्थशास्त्रज्ञांनी हे निःसंदिग्धपणे मांडले आहे की, चलन हे अंतिमतः राष्ट्राच्या उत्पादन क्षमतेवरील एक हक्क असते. भारताकडे ही मालमत्ता आज मुबलक प्रमाणात आहे. जेम्स टॉबिन यांनी 'क्यू रेशो'चे वर्णन मालमत्तेचे बाजारमूल्य आणि तिची पुनर्स्थापना किंमत यांमधील संबंध स्पष्ट करण्यासाठी केले आहे. आज भारताच्या सूचीबद्ध सार्वजनिक उपक्रमांचे मूल्य ३९ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे आणि सरकारी बँकांचे मूल्य १७ लाख कोटी रुपयांच्या घरात आहे. अशा वेळी, वैधानिक ५१ टक्के मर्यादेपेक्षा जास्त असलेला सरकारी हिस्सा वेगळा करून, सिंगापूरच्या 'जीआयसी'च्या धर्तीवर 'अमृत काळ फंड' नावाचा एक सार्वभौम संपत्ती निधी उभा करणे, ही एक उत्तम धोरणात्मक खेळी ठरू शकते, असा युक्तिवाद केला जात आहे. हा निधी डॉलर-मूल्यांकित फंडांच्या माध्यमातून परदेशी शेअर बाजारांसाठी आणि गिफ्ट सिटीसाठी अब्जावधी डॉलर्स उभे करू शकतो. एखादा देश आपल्या राष्ट्रीय मालमत्तांचे मुद्रीकरण थेट परकीय चलनात करण्याची भाषा करतो, तेव्हा तो स्वतःच्या देशांतर्गत चलनाची—म्हणचेच रुपयाची—अगतिकता मान्य करत असतो. १९९१ च्या आर्थिक संकटात जेव्हा भारताला आपले सोने बँक ऑफ इंग्लंडमध्ये गहाण ठेवावे लागले होते, तो इतिहास फार जुना नाही. आज आपण जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनण्याची स्वप्ने पाहत असताना, केवळ परकीय चलन साठ्याचा आकडा फुगवण्यासाठी इतका टोकाचा आणि 'डॉलर-धार्जिणा' पर्याय निवडणे कितपत शहाणपणाचे आहे, हा खरा प्रश्न आहे.

या जागतिक संकटांवर मात करण्यासाठी देशांतर्गत उत्पादकता वाढवणे, निर्यात सक्षम करणे आणि कररचना सुधारणे हेच काय ते दीर्घकालीन आणि स्वाभिमानी उपाय आहेत. मालमत्ता विकून किंवा त्या जागतिक बाजारात डॉलरसाठी गहाण ठेवून परकीय चलन गोळा करणे हा तात्पुरता मलमपट्टीचा प्रकार आहे. "घरची भांडी विकून बँकेतील बँक बॅलन्स वाढवण्यासारखा" हा प्रकार आहे, ज्याने समाधान मिळेल, पण आर्थिक स्वावलंबन धोक्यात येईल.

प्रशासकीय आणि धोरणात्मक अंगाने विचार केला तर, या डॉलर मुद्रीकरणात अनेक तांत्रिक पेच आहेत. जर उद्या जागतिक गुंतवणूकदारांनी डॉलरमध्ये गुंतवणूक केली, तर त्यांचे परतावे देखील डॉलरमध्येच द्यावे लागतील. म्हणजेच, ज्या डॉलरला आपण संरक्षणाची ढाल समजत आहोत, तीच ढाल उद्या आपल्या गळ्याचा फास बनू शकते.

**» परकीय चलनाचा बफर वाढवण्यासाठी सरकारी मालमत्तांचे थेट डॉलरमध्ये मुद्रीकरण करण्याचा सल्ला हा आकर्षक वाटत असला, तरी त्यातील अंतर्गत धोके आणि राष्ट्रीय स्वाभिमानाचा संकोच लक्षात घेणे गरजेचे आहे.**

शहाणपणाचे राजकारण आणि अर्थकारण यात नेहमीच एक सुवर्णमध्य गाठावा लागतो. पायाभूत सुविधांचे मुद्रीकरण हे देशांतर्गत चलनात करणे एकवेळ समजण्यासारखे आहे. यात थेट डॉलरचा शिरकाव होतो, तेव्हा जागतिक वित्तीय बाजारपेठेतील सट्टेबाज आणि हेज फंड्स आपल्या राष्ट्रीय धोरणांवर नियंत्रण ठेवू लागतात. वॉल स्ट्रीटवर बसलेले गुंतवणूकदार भारताच्या हितापेक्षा स्वतःच्या नफ्याचा विचार आधी करणार, हे उघड आहे.

परकीय चलनाचा साठा मजबूत असणे आवश्यक आहेच, पण त्यासाठी कोणती किंमत मोजावी लागत आहे, याचे भान ठेवणे आवश्यक आहे. 'फोरेक्स फोर्ट्रेस' उभारताना आपण आपल्याच रुपयाच्या सार्वभौमत्वाला सुरुंग तर लावत नाही ना, याची चाचपणी करण्याची गरज आहे. देशातील नागरिकांच्या क्रयशक्तीवर अर्थव्यवस्था उभी राहते. जागतिक वित्तीय संकटांचा बागुलबुवा उभा करून राष्ट्रीय मालमत्तांचे 'डॉलरकरण' करणे हा सुशासनाचा मार्ग नक्कीच नव्हे. या नव्या प्रयोगाच्या नादात आपण स्वाभिमानाचा लिलाव मांडणार नाही, इतकी सुबुद्धी सत्तेच्या खुर्चीवर बसलेल्यांना लाभो, हीच माफक अपेक्षा.

# ज्येष्ठ तबलावादक धोंडीराम सायकर यांचा गौरव

## महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मानपत्र प्रदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका तर्फे ज्येष्ठ तबलावादक धोंडीराम सायकर यांचा मानपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला. कला, क्रीडा, साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्याच्या महापालिकेच्या धोरणानुसार हा सन्मान करण्यात आला. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते धोंडीराम सायकर यांना मानपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, माजी महापौर तथा नगरसदस्या अपर्णा डोके, नगरसदस्या मनिषा चिंचवडे, नगरसदस्य अनंत कोऱ्हाळे, सुरेश भोईर, उपआयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड आणि जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते.

धोंडीराम सायकर यांचे पुत्र नरेंद्र सायकर, निलेश सायकर आणि नातू साहिल सायकर हेही या कार्यक्रमास उपस्थित होते. मानपत्राचे वाचन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

धोंडीराम सायकर यांनी पिंपरी चिंचवड शहराच्या सांस्कृतिक जडणघडणीत मोलाचे योगदान दिले आहे. बालवयापासून संगीत साधनेशी जोडले गेलेले त्यांचे नाते आजही अखंड सुरू आहे. आपल्या नेमक्या आणि भावपूर्ण तबलावादनातून त्यांनी अनेक नामवंत गायक आणि कलावंतांच्या मैफिली संस्मरणीय केल्या. विविध सांगीतिक व्यासपीठांवर तबल्याची प्रभावी साथसंगत करत त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीत परंपरा जपण्याचे काम केले. नवोदित कलाकारांना मार्गदर्शन, विविध स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणून सहभाग आणि सांस्कृतिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानामुळे शहराच्या सांस्कृतिक वातावरणाला त्यांनी समृद्ध केले आहे.

# एचएसआरपी नंबर प्लेट मोहिमेवर नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** राज्य शासनाच्या आदेशानुसार जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट अर्थात एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याची मोहीम गेल्या काही महिन्यांपासून राज्यभर राबविण्यात येत आहे. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करत अनेक वाहनधारकांनी वेळ आणि पैसा खर्च करून नवीन नंबर प्लेट बसवून घेतल्या. मात्र, आता वारंवार दिल्या जाणाऱ्या मुदतवाढींमुळे नियम पाळणाऱ्या नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

एचएसआरपी प्लेट बसविताना अनेकांकडून जादा शुल्क आकारण्यात आल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. स्लॉट मिळवण्यासाठी नागरिकांना अनेक दिवस प्रतीक्षा करावी लागली. तरीही भविष्यातील दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी प्रक्रिया पूर्ण केली. महाराष्ट्र परिवहन विभाग यांनी १८ फेब्रुवारी पासून नियमांची कठोर अंमलबजावणी होणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र, आता पुन्हा जूनअखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे अजूनही जुन्या नंबर प्लेटची, तसेच विनानंबर प्लेटची वाहने रस्त्यावर सर्रास फिरताना दिसत आहेत.

वाहनांची ओळख पटविणे, गुन्हेगारी रोखणे आणि वाहतूक व्यवस्थेत शिस्त आणणे हा एचएसआरपीचा उद्देश असला, तरी प्रत्यक्षात नियम पाळणाऱ्यांनाच त्रास सहन करावा लागत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

# लोणावळा-खंडाळ्यात पर्यटकांची मोठी गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणावळा :** लोणावळा आणि खंडाळा येथे सप्ताहाअखेरीस पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, त्यामुळे मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर दुतर्फा वाहतूककोंडी निर्माण झाली आहे. सकाळपासूनच शहरात वाहनांची संख्या वाढू लागली असून, दिवसभर पर्यटकांची वर्दळ कायम होती.

खंडाळा घाटातील 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे पूर्वीप्रमाणे मोठी वाहतूककोंडी होत नसल्याने पर्यटकांचा ओघ वाढल्याचे चित्र आहे. घाटातील प्रवास तुलनेने सुलभ झाल्याने अनेक पर्यटक आता कोकणाऐवजी थंड हवेच्या ठिकाणांकडे वळत आहेत.

मुंबई आणि पुण्यापासून जवळ असलेले पर्यटनस्थळ म्हणून लोणावळा-खंडाळा पर्यटकांची पहिली पसंती ठरत आहेत. यंदा लोणावळ्यातही उष्णतेचे प्रमाण वाढले असले, तरी सकाळ आणि संध्याकाळच्या वेळेत येथील वातावरण अल्हाददायक राहत असल्याने पर्यटक मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. खंडाळ्यातील राजमाची पॉइंट, ड्युक्स नोज पॉइंट आणि बोटिंग पॉइंटवर पर्यटकांची विशेष गर्दी दिसून आली. तसेच लायन्स पॉईंट, आई एकवीरा देवी मंदिर, तुंगार्ली तलाव, भाजे लेणी आणि पवना धरण परिसरातही पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे.

# महापौर रवि लांडगे यांचा सायकल प्रवास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** रवि लांडगे यांनी इंधन बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी शुक्रवारी सायकलने प्रवास करत नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीपर्यंत त्यांनी आपल्या निवासस्थानापासून सायकलवरून प्रवास केला.




पिंपरी चिंचवड महानगरपालिका तर्फे आयोजित या उपक्रमाद्वारे इंधन बचत, पर्यावरण संवर्धन आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधन बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याचे केलेले आवाहन लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आल्याचे महापौरांनी सांगितले. रवि लांडगे हे आपल्या निवासस्थानातून सायकलवरून महापालिकेकडे रवाना झाले. शहरातील प्रमुख मार्गांवरून सायकलने प्रवास करत त्यांनी नागरिकांना इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश दिला.

यावेळी महापालिकेचे सह शहर अभियंता बापू गायकवाड, उप अभियंता अमित दीक्षित, महापौरांचे स्वीय सहाय्यक अभय चौगुले आणि संदीप पालांडे हेही त्यांच्या समवेत सहभागी झाले होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या इंधन बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीच्या संदेशातून प्रेरणा घेऊन आजचा सायकल प्रवास करण्यात आला आहे. पुढे आठवड्यातून एक दिवस सायकलने प्रवास करण्याचे नियोजन करण्यात आले आहे." त्यांनी सांगितले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांनीही दैनंदिन जीवनात सायकलचा वापर, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर आणि इंधन बचतीच्या सवयी अंगीकाराव्यात, असे आवाहन त्यांनी केले. "सायकलचा वापर हा केवळ इंधन बचतीपुरता मर्यादित नसून, तो निरोगी जीवनशैली, स्वच्छ हवा आणि पर्यावरण संवर्धनासाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे. इंधन बचत हीच खरी राष्ट्रसेवा आहे," असेही महापौरांनी नमूद केले.

# जमिनीच्या व्यवहारातून ७० लाख रुपयांची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** आळंदी परिसरात जमिनीच्या व्यवहारातून तब्बल ७० लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी आळंदी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अद्याप फरार आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका महिला फिर्यादीने आळंदी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार दत्तात्रय भरत खैरे (वय ४०, रा. साईबाबा नगर, वडगाव रोड, आळंदी, ता. खेड, जि. पुणे) तसेच इतर निष्पन्न इसमांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही घटना ६ डिसेंबर २०२३ ते ७ मे २०२५ या कालावधीत मौजे चऱ्होली खुर्द




अधिकृत खरेदीखताद्वारे खरेदी केले होते. मात्र, संबंधित जमीन यापूर्वीच दुसऱ्या व्यक्तीस विक्री झाल्याची माहिती लपवून आरोपींनी त्याच जमिनीचा पुन्हा व्यवहार केल्याचा आरोप आहे. तसेच, कुलमुखत्यारपत्र आणि पूर्वीचे खरेदीखत अस्तित्वात असतानाही आरोपींनी तीच जागा पुन्हा विकून फिर्यादीचा विश्वासघात करत आर्थिक फसवणूक केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१८(४), ३३६(३), ३३९ आणि ३४०(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करत आहेत.

**तरुणावर जीवघेणा हल्ला**

**पिंपरी:** वाकड परिसरात जुन्या वादातून एका तरुणावर जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी वाकड पोलीस ठाणे पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकार १५ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास औंध-रावेत बीआरटी रोडवरील कावेरीनगर सबवे परिसरात घडला. याप्रकरणी निकेश बंडू क्षीरसागर (वय २२, रा. पवार इस्टेट, थेरगाव) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी किरण दीपक विटकर (वय २५) आणि चेतन दीपक विटकर (वय २७, दोघेही रा. १६ नंबर, पराग ज्वेलर्सच्या पाठीमागे, वाकड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यातील किरण विटकर याला पोलिसांनी अटक केली आहे. फिर्यादी आणि आरोपी यांच्यात पूर्वीपासून वर्चस्वाच्या कारणावरून वाद असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. त्याच रागातून आरोपींनी फिर्यादीला अडवून त्याच्या अंगावर मोटारसायकल घातली व त्याला खाली पाडले.

त्यानंतर "तू खूप मध्ये मध्ये करतोस, आज तुला संपवतो," अशी धमकी देत आरोपींनी लोखंडी रॉडने डोक्यावर वार केला. तसेच बॅरिकेड उचलून अंगावर टाकत लाथाबुक्क्यांनी मारहाण करून गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेचा पुढील तपास वाकड पोलीस करत आहेत.

**क्रेनखाली चिरडून मृत्यू**

**महाळुंगे:** खेड तालुक्यातील निघोजे परिसरात क्रेनच्या निष्काळजीपणामुळे एका २१ वर्षीय कामगाराचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या प्रकरणी दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ मे २०२६ रोजी दुपारी अँडेरिवा इन्फाटेक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या शिंदेवस्ती येथील परिसरात काम सुरू होते. यावेळी क्रेनच्या सहाय्याने लोखंडी अँगलची वाहतूक केली जात होती.

क्रेन चालक अंकितकुमार ओमप्रकाश मंजी याने निष्काळजीपणे क्रेन चालविल्याने कामगार सत्येंद्र श्रीनिवास साकेत (वय २१) खाली पडला. त्यानंतर क्रेनचे टायर त्याच्या अंगावरून गेल्याने तो गंभीर जखमी झाला. घटनास्थळी उपस्थित कामगारांनी त्याला तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी करण शिवकुमार साकेत (वय १८) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तरुणावर धारदार शस्त्राने हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** दापोडी परिसरात एका व्यक्तीवर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी दापोडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १३ मे २०२६ रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास पवना नदीजवळील परिसरात घडली. याप्रकरणी रवी राजूलिंगम पिल्ले (वय ४३, रा. दापोडी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी पवार वस्ती परिसरातून पायी घरी जात असताना आरोपींनी त्यांना अडवले. त्यानंतर शिवीगाळ करत हाताने मारहाण करण्यात आली. तसेच धारदार शस्त्राने कानाजवळ, जबड्याखाली, मानेवर आणि पायावर वार करून गंभीर जखमी करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी गोविंद (पूर्ण नाव व पत्ता अज्ञात), ऋषिकेश सुनील घोरपडे (वय २०, रा. मोहननगर, भोसरी) तसेच एका अज्ञात साथीदाराविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींपैकी ऋषिकेश घोरपडे याला पोलिसांनी अटक केली असून, इतर आरोपींचा शोध सुरू आहे. हल्ल्यानंतर आरोपी पांढऱ्या रंगाच्या कारमधून पसार झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### विवाहितेचा गळा दाबून खून

**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील निमगाव तर्फे महाळुंगे येथे एका विवाहितेचा तिच्याच पतीने खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पती नवनाथ बाजीराव पारखे याला अटक केली असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत महिला रुपाली नवनाथ पारखे हिचा शनिवारी दुपारच्या सुमारास शेतातील गोठ्यात गळा दाबून खून करण्यात आला. आरोपी पतीने दोन्ही हातांनी तिचा गळा आवळून हत्या केल्यानंतर हा प्रकार आत्महत्येचा असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने आरोपीने रुपालीच्या गळ्याला दोरखंड बांधून तिला गोठ्यातील लोखंडी पाईपाला लटकावले, जेणेकरून तिने गळफास घेतल्याचा आभास निर्माण होईल. या घटनेप्रकरणी मृत महिलेचा भाऊ विकास वसंत पवार (रा. बल्लाळवाडी) यांनी पोलिसांकडे फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार पोलिसांनी आरोपी नवनाथ पारखे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला तातडीने अटक केली. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील तसेच पोलीस निरीक्षक किरण अवचर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

### ‘मांगूर’ माशांची बेकायदेशीर वाहतूक

**उरुळी कांचन :** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बंदी असलेल्या ‘मांगूर’ जातीच्या माशांची बेकायदेशीर वाहतूक केल्याप्रकरणी उरुळी कांचन पोलिसांनी भिवंडी येथील चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मानवी आरोग्य आणि पर्यावरणासाठी धोकादायक मानल्या जाणाऱ्या या माशांच्या वाहतुकीमुळे प्रशासनाने कठोर कारवाई केली आहे. ही कारवाई शनिवारी सायंकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास सोरतापवाडी ग्रामपंचायत हद्दीतील म्हसोबा मंदिरासमोर करण्यात आली.

## तालुक्यावर अन्याय झाल्याचा शरद बुट्टे पाटील यांचा आरोप

# खेडसाठी पाणीटंचाई आराखडा चुकीचा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरूनगर :** खेड तालुक्यासाठी तयार करण्यात आलेला पाणीटंचाई आराखडा चुकीचा असून त्यामुळे पाणीटंचाई निवारणाच्या कामात अडचणी निर्माण झाल्या आहेत. जिल्ह्यातील इतर तालुक्यांच्या तुलनेत खेड तालुक्यावर अन्याय करण्यात आल्याचा आरोप जिल्हा परिषदेचे माजी सभापती शरद बुट्टे पाटील यांनी केला.

राजगुरूनगर येथे शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषद सदस्य गणेश बोत्रे, बाजार समितीचे संचालक विनोद उर्फ पप्पू टोपे तसेच सरपंच दत्ता मांडेकर उपस्थित होते.



शरद बुट्टे पाटील म्हणाले की, पाणीपुरवठा हा स्थानिक स्वराज्य संस्थांचा विषय असून त्यासाठी पंचायत समितीकडून टंचाई आराखडा तयार केला जातो. या आराखड्यावर आमदार, पंचायत समिती सभापती, तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि पाणीपुरवठा अभियंत्यांच्या सह्या आहेत. मात्र, खेड तालुक्यातील प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात न घेता केवळ औपचारिकता म्हणून आराखडा तयार करण्यात आला आहे.

“प्रत्येक गावातील सरपंच व ग्रामसेवकांकडून आढावा घेणे आवश्यक होते. मात्र तसे न करता ठराविक अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी ठोकताळ्याचा आराखडा तयार करून जिल्हा परिषदेकडे पाठवला,” असा आरोप त्यांनी केला.

तालुक्यात साधारण १५ टँकर लागतील असा प्रस्ताव आराखड्यात करण्यात आला असून १०९ गावठाणे व वाड्यावस्त्यांना टँकरने पाणीपुरवठ्याचा उल्लेख आहे. तसेच ७० ते ८० विंधनविहिरी अधिग्रहित करण्याचा प्रस्ताव आहे. मात्र, कायमस्वरूपी उपाययोजनांचा अभाव असल्याची टीका त्यांनी केली. तालुक्यात अनेक नळपाणी पुरवठा योजना किरकोळ दुरुस्तीअभावी बंद असल्याचे सांगत त्यांनी म्हटले की, जिल्ह्यातील १५४ योजनांच्या दुरुस्तीसाठी १२ कोटी २१ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असताना खेड तालुक्यासाठी मात्र एक रुपयाही मंजूर करण्यात आलेला नाही. अनेक गावांमध्ये मुख्य जलवाहिन्यांची दुरुस्ती आणि बंद पडलेल्या विद्युत पंपांच्या दुरुस्तीची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेत बोलताना शरद बुट्टे पाटील यांनी काही स्थानिक नेत्यांवरही टीका केली. “तालुक्यातील पुढारी लग्न, दशक्रिया आणि साखरपुडा कार्यक्रमांत व्यस्त आहेत. काहीजण तर कार्यक्रमांमध्ये रिल बनवण्यात रमले आहेत. जनतेच्या प्रश्नांपेक्षा प्रसिद्धीला अधिक महत्त्व दिले जात आहे,” असा टोला त्यांनी लगावला. “जनतेने प्रश्न सोडवण्यासाठी निवडून दिले आहे. मात्र पाणीटंचाईसारख्या गंभीर प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे,” असेही ते म्हणाले.

## श्री शनैश्वर देवस्थानात भाविकांची मोठी गर्दी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांजणगाव गणपती :** शिरुर शहरातील पुरातन व जागृत समजल्या जाणाऱ्या श्री शनैश्वर देवस्थान येथे शनी जयंतीनिमित्त आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. शनी जयंती आणि शनि अमावस्या एकत्र आल्याने यंदा दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली. दिवसभर हजारो भाविकांनी शनिदेवाचे दर्शन घेतल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक रवि गोसावी यांनी दिली.

पहाटे पाच वाजता श्री शनैश्वर मंदिरातील मूर्तीला विधिवत अभिषेक व महाआरती करण्यात आली. त्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. सकाळपासूनच दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. दर्शनासाठी आलेल्या भाविकांसाठी खिचडी व फराळाची व्यवस्था करण्यात आली होती.

वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी मंदिर समितीच्या वतीने मंडप तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. मंदिर परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शिरुर पोलिसांकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# आजोबांच्या घरफोडीचा छडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळेफाटा :** जुन्नर तालुक्यातील नेतवड (कुटेमळा) येथे ९५ वर्षीय वृद्धाच्या घरात झालेल्या घरफोडीचा अवघ्या काही दिवसांत छडा लावत ओतूर पोलिसांनी आरोपीला अटक केली. विशेष म्हणजे चोरीस गेलेले तब्बल ४ लाख २० हजार रुपये किमतीचे सात तोळे सोन्याचे दागिने शंभर टक्के हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. या कारवाईमुळे परिसरात पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नेतवड कुटेमळा (ता. जुन्नर) येथील बजाबा महादू कुटे (वय ९५) यांनी त्यांच्या पत्नीचे सोन्याचे दागिने घरातील पोटमाळ्यावर सुरक्षित ठेवले होते. दरम्यान, १ मे ते ७ मे २०२६ या कालावधीत अज्ञात चोरट्याने घरातील पेटीचा कडी-कोयंडा तोडून दागिने चोरून नेले.

चोरीस गेलेल्या ऐवजात तीन तोळ्यांचे मनीमंगळसूत्र, अडीच तोळ्यांचे सहा सोन्याचे पान व एक पुतळा, अर्धा तोळ्याची सोन्याची नथ तसेच एक तोळ्याच्या दोन सोन्याच्या पेट्या असा एकूण सात तोळे वजनाचा आणि ४ लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल होता.

याप्रकरणी तान्हाजी बजाबा कुटे (वय ५६, रा. नेतवड कुटेमळा) यांनी ओतूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१(३) आणि ३०५ अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासाची जबाबदारी पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव यांच्याकडे सोपविण्यात आली होती.

ओतूर पोलिसांनी तांत्रिक माहिती आणि गोपनीय सूत्रांच्या आधारे तपास करत आरोपी अभिषेक खंडू कुटे (वय ३२, सध्या रा. टिटवाळा, जि. ठाणे, मूळ रा. नेतवड कुटेमळा) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीस गेलेले सर्व सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल परत मिळाल्याने फिर्यादी कुटुंबीयांनी पोलिसांचे आभार मानले.

दरम्यान, नागरिकांनी मौल्यवान वस्तू सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात तसेच गावांमध्ये अधिकाधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असे आवाहन ओतूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांनी केले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे आणि जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे, पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव, पोलीस हवालदार नरेंद्र गोराणे, बाळशिराम भवारी तसेच पोलीस कर्मचारी विशाल गोडसे, आशिष जगताप आणि योगेश उकिर्डे यांनी केली.

# मंदिरातील चोरी करणारी टोळी गजाआड

## आळेफाटा पोलिसांची कारवाई, ३.३० लाखांचा मुद्देमाल जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळेफाटा :** बेल्हे (ता. जुन्नर) येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मुक्ताई माता मंदिरातून साऊंड सिस्टम आणि टेंपो चोरी करणाऱ्या परजिल्ह्यातील टोळीला आळेफाटा पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत तीन आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या असून त्यांच्याकडून ३ लाख ३० हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतवाडी (ता. जुन्नर) येथील विजय शरद फापाळे यांच्या मालकीचा टाटा कंपनीचा ७०९ टेंपो तसेच दोन एम्प्लिफायर मशीन १८ एप्रिल रोजी रात्री चोरीला गेले होते. याप्रकरणी आळेफाटा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्या सूचनेनुसार पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांच्या पथकाने तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी युवराज पोपट कातोरे (वय २८), निवृत्ती भाऊसाहेब मेंगाळ (वय २०) आणि अजय किसन मेंगाळ (वय २५, सर्व रा. जाबूत बु., ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) या तिघांना ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान आरोपींनी बेल्हे येथील मुक्ताई माता मंदिरातून चोरी केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून एम्प्लिफायर मशीन, मिक्सर, एलईडी टीव्ही, देवीचे मंगळसूत्र तसेच इतर साहित्य असा एकूण ३ लाख ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विश्वास जाधव, पोलीस उपनिरीक्षक सतीश टाकरे, राजेंद्र हिले, भिमा लोंढे, विनोद गायकवाड, पंकज पारखे, अमित माळुंजे, नवीन अरगडे, ओंकार खुणे, गणेश जगताप, प्रशांत तांडगकर आणि सखाराम झुंबड यांच्या पथकाने केली.

# गावठी पिस्तूलासह तरुण अटकेत



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** चाकण परिसरातील चक्रेश्वर रोडवर बेकायदेशीरपणे गावठी बनावटीचे पिस्तूल आणि जिवंत काडतूस बाळगणाऱ्या एका तरुणाला चाकण पोलिसांनी सापळा रचून अटक केली. शुक्रवारी दुपारी सव्वाचार वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

गौरव मच्छिंद्र डोंगरे (वय २९, रा. चक्रेश्वर रोड, चाकण, ता. खेड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी चाकण पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई सुमीत जगझाप यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी संशयास्पद हालचाली करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपीची झडती घेतली. यावेळी त्याच्याकडून ५१ हजार रुपये किमतीचे देशी बनावटीचे पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस विनापरवाना जप्त करण्यात आले. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चंद्रशेखर मोरखंडे, पोलीस हवालदार भैरोबा यादव, प्रीतम ढमढेरे आणि पोलीस शिपाई सुमीत जगझाप यांनी केली.

मागील काही दिवसांपासून चाकण परिसरातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांविरोधात तडीपार आणि अन्य कठोर कारवाया सुरू करण्यात आल्या आहेत. विविध ठिकाणी छापेमारी करून संशयितांची तपासणी करण्यात येत असून, त्यातून अनेक धारदार शस्त्रे आणि हत्यारे जप्त करण्यात आली आहेत. चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी परिसरातील गुन्हेगारांची स्वतंत्र माहिती संकलित करून जुन्या प्रकरणांचीही पुन्हा छाननी सुरू केली आहे. त्यामुळे आगामी काळात आणखी मोठ्या कारवाया होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## डिंभे उजव्या कालव्याला पाणी सोडण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील पाणीटंचाई गंभीर बनली असून, डिंभे धरणातून डिंभे उजव्या कालव्याला तातडीने पाणी सोडावे, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्य विष्णू काका हिंगे पाटील यांनी पाटबंधारे विभागाकडे केली आहे.

तालुक्यातील पहाटदरा, शिरदाळे, लोणी, धामणी, वडगावपीर, मांदळवाडी, खडकवाडी आणि रानमळा या गावांमध्ये मार्च महिन्यापासूनच विहिरींनी तळ गाठला आहे. काही गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असून नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. निघोटवाडी, शेवाळवाडी, अवसरी खुर्द, अवसरी बुद्रुक, गावडेवाडी, मेंगडेवाडी आणि जारकरवाडी या गावांतील शेती मोठ्या प्रमाणात डिंभे उजव्या कालव्याच्या पाण्यावर अवलंबून आहे. या भागातील शेतकरी भाजीपाला शेतीसोबत दुग्ध व्यवसाय आणि ऊस शेती करतात. मात्र, यंदा उन्हाची तीव्रता वाढल्याने मका, कडवळ, उन्हाळी बाजरी तसेच हिरवा चारा पाण्याअभावी जळू लागला आहे. विहिरी कोरड्या पडल्याने पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. दुभत्या जनावरांसाठी हिरवा चारा उपलब्ध नसल्याने दूध उत्पादनावर परिणाम होत आहे. त्यामुळे दुग्ध व्यवसाय अडचणीत सापडला आहे.

माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी पाटबंधारे मंत्र्यांशी चर्चा करून तातडीने डिंभे उजव्या कालव्याला पाणी सोडावे, अशी मागणी पंचायत समिती सदस्य अंकिता अनिल वाळुंज यांनीही केली आहे. शेतकरी आणि ग्रामस्थांकडूनही प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

## १० किलो वांग्याला ३०० रुपये



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील रांजणी गावातील शेतकरी प्रकाश वाघ यांनी वांग्याचे भरघोस उत्पादन घेत यशस्वी शेतीचा आदर्श निर्माण केला आहे. सध्या बाजारात वांग्याला दहा किलोमागे तब्बल ३०० रुपयांपर्यंत बाजारभाव मिळत असल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

प्रकाश वाघ यांनी नियोजनबद्ध शेती, वेळेवर मशागत, संतुलित खत व्यवस्थापन आणि नियमित निगा यांच्या जोरावर वांग्याच्या पिकातून चांगले उत्पादन घेतले आहे. त्यांच्या शेतातील वांग्याची गुणवत्ता उत्तम असल्यामुळे बाजारात या मालाला मोठी मागणी निर्माण झाली आहे. परिणामी उत्पादनासोबतच आर्थिकदृष्ट्याही त्यांना चांगला फायदा होत आहे.

मध्यंतरी वांग्याच्या बाजारभावात मोठी घसरण झाली होती. मात्र, त्या परिस्थितीत खचून न जाता वाघ यांनी पिकाची काळजी घेणे सुरूच ठेवले. वाढत्या उष्णतेमुळे वांग्याच्या पिकावर कीड व रोगांचा प्रादुर्भाव झाला होता. तरीही त्यांनी वेळेवर औषध फवारणी, नियमित पाणीपुरवठा आणि योग्य व्यवस्थापन करत पीक वाचवले. त्यांच्या या चिकाटीचे फळ आता चांगल्या बाजारभावाच्या रूपाने मिळत आहे.

सध्या उन्हाळ्यामुळे अनेक भाजीपाला पिकांवर विपरीत परिणाम होत असताना प्रकाश वाघ यांनी घेतलेले वांग्याचे उत्पादन परिसरातील इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. मेहनत, सातत्य आणि आधुनिक शेती पद्धतींचा वापर केल्यास भाजीपाला शेतीतूनही चांगले उत्पन्न मिळू शकते, असे प्रकाश वाघ यांनी सांगितले.

## चाकण बाजारात ८.३० कोटींची उलाढाल

# कांद्याच्या आवकेत घट, दरात मोठी घसरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये रविवारी कांद्याच्या आवकेत काहीशी घट झाली असली, तरी बाजारभावात आणखी घसरण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. कांदा, बटाटा, हिरवी मिरची, भोपळा आणि वाटाणा यांची मोठ्या प्रमाणावर आवक झाल्याने बाजारात दरावर दबाव निर्माण झाला. फळभाज्या आणि पालेभाज्यांच्या दरातही घसरण नोंदवण्यात आली.



दिवसभरातील बाजाराची एकूण उलाढाल तब्बल ८ कोटी ३० लाख रुपयांवर पोहोचली.

बाजार समितीच्या माहितीनुसार, रविवारी कांद्याची एकूण ३ हजार २५० क्विंटल आवक झाली. कांद्याला दर्जानुसार ५०० ते १ हजार २०० रुपये प्रतिक्विंटल असा भाव मिळाला. दर्जा क्रमांक एकच्या कांद्याला १,२०० रुपये, दुसऱ्या दर्जाच्या कांद्याला १,००० रुपये, तर तिसऱ्या दर्जाच्या कांद्याला ५०० रुपये दर मिळाला. मागील काही दिवसांपासून कांद्याच्या बाजारात सुरू असलेली घसरण कायम असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

बटाट्याची आवक २ हजार क्विंटल झाली असून त्याला कमाल १ हजार ४०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. लसणाची आवक फक्त २५ क्विंटल झाली, मात्र त्याला तब्बल १२ हजार रुपये प्रतिक्विंटल असा उच्चांक भाव मिळाला. हिरव्या मिरचीची ३१० क्विंटल आवक झाली असून तिला ४ हजार ५०० ते ५ हजार ५०० रुपये दर मिळाले.

फळभाज्यांच्या बाजारातही मोठ्या प्रमाणावर मालाची आवक झाली. टोमॅटोची २७४ क्विंटल आवक झाली असून त्याला २,५०० ते ३,००० रुपये दर मिळाला. कोबीला ८०० ते ९०० रुपये, फ्लॉवरला १,२०० ते १,३०० रुपये, वांग्याला ३,००० ते ४,००० रुपये, तर भेंडीला ३,५०० ते ४,५०० रुपये भाव मिळाले.

दोडका, कारली, गवार, आले आणि ढोबळी मिरची यांचीदेखील मोठ्या प्रमाणावर आवक झाली. ढोबळी मिरचीला ५,००० ते ६,००० रुपये, गवारला ४,५०० ते ५,५०० रुपये, तर आल्याला ४,५०० ते ५,५०० रुपये दर मिळाला. फरशीला सर्वाधिक १४ हजार ते १५ हजार रुपये दर मिळाल्याचे बाजार समितीने सांगितले.

पालेभाज्यांमध्ये कोथिंबिरीची सर्वाधिक २१ हजार ९७५ जुड्यांची आवक झाली. तिला २,००० ते २,५०० रुपये दर मिळाला. मेथीच्या ६ हजार १८५ जुड्या बाजारात दाखल झाल्या असून तिला १,६०० ते २,००० रुपये दर मिळाला. पालक, शेपू यांच्याही दरात घसरण झाली.

## पुलावरून चारचाकी कोसळली; एक महिला व दोन तरुण जखमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** मंचर-शिरूर रस्त्यावर अवसरी खुर्द गावच्या हद्दीत स्मशानभूमीजवळ शनिवारी (दि. १६) सकाळी साडेअकराच्या सुमारास भीषण अपघात झाला. समोरून जाणाऱ्या वाहनाने अचानक हुलकावणी दिल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि चारचाकी थेट पुलावरून खाली कोसळली. या अपघातात एक महिला व दोन तरुण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, जखमींमध्ये साहिल गंगाधर पानसरे (वय १९), अर्चना गंगाधर पानसरे (वय ४०) आणि दीपक भागुजी पानसरे (वय २१, सर्व रा. पारगाव गंगेवाडी, ता. आंबेगाव) यांचा समावेश आहे. हे तिघेही एकाच कुटुंबातील असून देवदर्शनासाठी मढी येथे गेले होते. देवदर्शन करून घरी परतत असताना अवसरी खुर्द गावाजवळ हा अपघात घडला. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य करत जखमींना बाहेर काढले व उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

